# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक: २अ/एडीएम /२०१८/१०८०
दिनांक : १४.८.२०१८

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या कट ऑफ दिनांक व जात वैधता प्रमाणपत्रासाठी मुदतवाढ देणेबाबत....

संदर्भ: १. संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २अ/एडीएम/२०१८/८७२, दिनांक १२.७.२०१८

२. संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २अ/एडीएम/२०१८/१०४४,दिनांक १०.८.२०१८

३. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१/प्र.क्र.०६/तांशि-४,दिनांक ९.८.२०१८

४. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०१८/प्र.क्र.२८१/तांशि-४, दिनांक १४.८.२०१८

५. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.०६/तांशि-४,दिनांक१४.८.२०१८

६. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक सीईटीसेल/ तंत्र/ संकीर्ण /२०१८/११७२, दिनांक १४.८.२०१८

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी शासनाच्या दिनांक २४.६.२०१८ रोजीच्या अध्यादेशास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता मागास प्रवर्गातील उमेदवारांना प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यासंबंधातील पावती सादर करून अर्ज स्वीकृती व प्रवेश प्रक्रियेत सहभागी करून घेण्यात आले आहे. अशा उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन क्रमांक १ व २ च्या पत्रान्वये सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार अभ्यासक्रमनिहाय जात वैधता व नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठीचे दिनांक निश्चित करण्यात आलेले आहेत.

शासनाचे वरील संदर्भ क्रमांक ४ व ५ चे अनुषंगाने राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य ,मुंबई यांनी त्यांचे संदर्भ क्रमांक ६ च्या पत्रान्वये संचालनालयास निर्देश दिलेले आहेत. सदर निर्देश विचारात घेऊन अभ्यासक्रमनिहाय प्रवेशाचा सुधारीत कट ऑफ दिनांक व प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अंतिम दिनांक खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेशाचा पूर्वी जाहीर केलेला कट ऑफ दिनांक | सुधारीत कट ऑफ दिनांक | जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यकतेनुसार नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठीचा सुधारीत अंतिम दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी | १४.८.२०१८ | ३१.८.२०१८ | २५.८.२०१८ |
| २ | प्रथमवर्ष औषधनिर्माणशास्त्र व फार्म डी पदवी | १४.८.२०१८ | ३१.८.२०१८ | २५.८.२०१८ |
| ३ | प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी | १४.८.२०१८ | ३१.८.२०१८ | २५.८.२०१८ |
| ४ | प्रथम वर्ष हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेकनॉलॉजी पदवी | १४.८.२०१८ | ३१.८.२०१८ | २५.८.२०१८ |
| ५ | प्रथमवर्ष एमबीए / एमएमएस पदव्युत्तर पदवी | १४.८.२०१८ | ३१.८.२०१८ | २५.८.२०१८ |
| ६ | प्रथम वर्ष आणि थेट द्वितीय वर्ष एमसीए पदव्युत्तर पदवी | २५.८.२०१८ | ३१.८.२०१८ | २५.८.२०१८ |
| ७ | प्रथम वर्ष एम.आर्च. पदव्युत्तर पदवी | २५.८.२०१८ | ३१.८.२०१८ | २५.८.२०१८ |
| ८ | प्रथम वर्ष एम.एचएमसीटी पदव्युत्तर पदवी | २४.८.२०१८ | ३१.८.२०१८ | २५.८.२०१८ |

सर्व संबंधित संस्था व विद्यार्थ्यांनी वरील तक्यात नमूद केलेल्या दिनांकांची नोंद घ्यावी. वरीलप्रमाणे नमूद केलेल्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र व नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात येतील.

तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी आणि पदव्युत्तर संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील प्रवेश वाटप झालेल्या ज्या विद्यार्थ्यांनी वरील प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यासंबंधातील पावती सादर करून प्रवेश प्रक्रियेत सहभाग घेतला होता त्यांचेकडून वरील मुदतीत आवश्यक प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्वरीत त्याची ऑनलाईनपध्दतीने न चुकता नोंद करण्यात यावी व त्याची पोचपावती संबंधित विद्यार्थ्यांना त्वरीत देण्यात यावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना सविनय सादर
प्रत : माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी :

१. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,अमरावती,औरंगाबाद,नागपूर- त्यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात यावे.
2. संबंधित सर्व प्रवेश निश्चिती केंद्र,त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचनेप्रमाणे विद्यार्थ्यांनी सादर केलेले प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने नोंद करुन त्याची पोचपावती संबंधित विद्यार्थ्यांना देण्याची कार्यवाही करावी.